॥ ग्रामदैवत ॥
श्री अंबिका माता



॥ ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे ॥

# ग्रामपंचायत कार्यालय देवीभोयरे

ता. पारनेर, जि. अहमदनगर



उपसरपंच
सौ. सुलोचना रावसाहेब वाढवणे
मो. ९८८१४२२४७५

सरपंच
श्री. विठ्ठलराव रंगनाथ सरडे
मो. ९९२१५९५९२४

जावक क्र. ५१२ दिनांक : / /२०२

ग्रामपंचायत देवीभोयरे स्थापना १९५१ ता.पारनेर, जि.अहमदनगर

प्रती,
आमदार लोकनेते श्री निलेशजी लंके साहेब
विधानसभा सदस्य, पारनेर–नगर

विषय – देवीभोयरे ते शिरापुर ३ किमी रस्ता खडीकरण–डांबरीकरण होणेबाबत

महाशय,

वरील विषयानुसार विनंती की, देवीभोयरे ते शिरापुर हा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. हा रस्ता शिरापुर कडून पुणे जिल्ह्याला जोडणारा आहे. देवीभोयरे ग्रामस्थांच्या दृष्टीने तसेच वाजेवाडी, नरसाळेवाडी, शिरापुर ह्या ही ग्रामस्थांच्या दृष्टीने हा रस्ता अत्यंत गरजेचा आहे

पावसाळ्यात ह्या रस्त्याने जाणे–येणे अशक्य होत आहे. त्यामुळे आपणास समस्त देवीभोयरे ग्रामस्थांच्या वतीने नम्रपुर्वक विनंती आहे. की सदर रस्ता हा आपले निधीअंतर्गत डांबरीकरण होऊन मिळावा.

| ग्रामविकास अधिकारी | उपसरपंच | सरपंच |
| --- | --- | --- |
| ग्रामपंचायत देवीभोयरे | ग्रामपंचायत देवीभोयरे | ग्रामपंचायत देवीभोयरे |
| ता.पारनेर, जि.अ.नगर | ता.पारनेर, जि.अ.नगर | ता.पारनेर, जि.अ.नगर |

॥ ग्रामदैवत ॥
श्री अंबिका माता



।। ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे ।।

# ग्रामपंचायत कार्यालय देवीभोयरे

**ता. पारनेर, जि. अहमदनगर**

| उपसरपंच | सरपंच |
|---|---|
| सौ. सुलोचना रावसाहेब वाढवणे | श्री. विठ्ठलराव रंगनाथ सरडे |
| मो. ९८८१४२२४७५ | मो. ९९२१५९५९२४ |

जावक क्र. ५१/२२ दिनांक : / /२०२

मासिकसभा - दिनांक ३०/०३/२०२२ ठराव क्रमांक १२ ची नक्कल

विषय नं.१२- देवीभोयरे ते शिरापुर ३ किमी रस्ता खडीकरण, डांबरीकरण होणेबाबत

ठराव नं.१२ – सदर विषयावर सभेत चर्चा करण्यात आली व असे ठरले कि, देवीभोयरे ते शिरापुर वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा रस्ता आहे परंतू हा रस्ता अत्यंत खराब झालेला आहेत. त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहे.पावसाळ्यात तर त्या रस्त्याने जाणे-येणे धोक्याचे आहे. हा रस्ता पिंपरीजलसेन वरुन देवीभोयरे मार्गे शिरापुरकडे जाणारा आहे.

देवीभोयरे वरुन शिरापुर मार्गे पुणे जिल्ह्याला जोडणारा हा रस्ता आहे. या रस्त्याने देवीभोयरे, वाजेवाडी, नरसाळेवाडी, शिरापुर या गावातील ग्रामस्थांचा प्रवास असतो. आमच्या देवीभोयरे गावची गाजरेवस्ती, कौलावस्ती, मगरवस्ती, बेलोटेवस्ती ह्या वस्त्या रस्त्याच्या बाजुला आहे. तेथील वस्तीवरील लोकसंख्या १००० ते ११०० च्या दरम्यान आहे. शाळेतील मुले ह्याच रस्त्याने गावात ये-जा करत असतात. शेतमाल वाहतूक पुणे जिल्ह्याकडे मुख्य कडून ह्याच रस्त्याने होत असतो

या रस्त्याच्या संदर्भात मागील लोकप्रतिनीधींकडे वारंवार रस्त्यासंदर्भात मागणी केली होती परंतू त्याकडे पुर्णता दुर्लक्ष झालेले आहे. सदर वस्तीच्या ग्रामस्थांची व गावातील ग्रामस्थांची आमदार लोकनेते श्री निलेशजी लंके साहेब यांचेकडून हा रस्ता डांबरीकरण होणेची फार मोठी आपेक्षा आहे. देवीभोयरे येथील ग्रामस्थ हे कायम आमदार साहेब यांच्या विचारांशी जोडलेले आहेत म्हणून आमदार साहेबांनी हा ३ किमी रस्ता मंजूर करावा अशी ग्रामस्थांतर्फे विनंती आहे.

सदर प्रस्ताव सभेत तयार करुन देण्याचे ठरले

सुचक – श्री. संपतराव देवराम वाळुंज
अनुमोदक – श्री. अशोकराव विष्णू मुळे
ठराव सर्वानुमते मंजुर

| ग्रामविकास अधिकारी | उपसरपंच | सरपंच |
|---|---|---|
| ग्रामपंचायत देवीभोयरे | ग्रामपंचायत देवीभोयरे | ग्रामपंचायत देवीभोयरे |
| ता.पारनेर, जि.अ.नगर | ता.पारनेर, जि.अ.नगर | ता.पारनेर, जि.अ.नगर |

# देवीभोयरे ते शिरापुर जोडरस्ता - अंतर ३ किमी.

ग्रामपंचायत देवीभोयरे

